नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे | Year - 3rd | अंक - ३२३ | Issue - 322 | वार मंगळवार दि. १४ एप्रिल २०२६ | Blow- Tuesday Date 14 April 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# यंदा राज्यासह देशात सरासरीपेक्षा कमी पावसाची शक्यता

## हवामान विभागाने व्यक्त केला अंदाज ; मे महिन्याच्या अखेरिस महत्त्वाची माहिती मिळणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : अवकाळी पावसाने गेल्या काही आठवड्यांमध्ये राज्यासह देशात थैमान घातल्यानंतर आता राज्यात उन्हाच्या झळा वाढल्या आहेत. अनेक ठिकाणी तापमानात वाढ झाली आहे. असं असताना एक महत्त्वाची बातमी समोर येत आहे. राज्यात आणि देशात या वर्षी किती पाऊस पडणार? याबाबतचा अंदाज हवामान विभागाकडून वर्तवण्यात आला आहे.

भारतीय हवामान विभागाकडून म ान्सूनचे पहिले दीर्घकालीन पूर्वानुमान जारी करण्यात आले आहे.

यंदा दीर्घकालीन सरासरीच्या ९२ टक्के (अधिक/उणे पाच टक्के) पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. त्यामुळे यंदा सरासरीपेक्षा कमी पाऊस पडणार असल्याचा अंदाज आहे. शेतकऱ्यांसाठी हे वृत्त चिंत-ाजनक आहे.

भारतीय हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार, राज्यात सरासरीहून कमी पावसाची शक्यता आहे. त्यामुळे शेती, पिण्यासाठी लागणारं पाणी, नदी, जलाशय, भुजल पातळी यावर परिणाम होऊ शकतो. ग्रामीण भागात याचे अधिक पडसाद पडू शकतात.

विशेष म्हणजे गेल्या तीन वर्षांत पहिल्यांदाच असा पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. त्यामुळे अनेकांची चिंता वाढली आहे.

हवामान विभागाच्या संशोधनात सरासरीच्या ९६ ते १०४ टक्के दरम्यान पडणारा पाऊस हा सामान्य पाऊस मानला जातो. तर ९० ते ९५ टक्के पावसाचे अंदाज असते तेव्हा तो सामान्य पेक्षा कमी पावसाचा अंदाज मानला जातो. तर ९० टक्क्यांपेक्षा कमी पाऊस हा अपुरा पाऊस मानला जातो.

२०२६ मध्ये नैऋत्य मान्सून हा सरासरीपेक्षा कमी राहण्याची शक्यता आहे. देशात दीर्घकालीन सरासरीच्या ९२ टक्के पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. तसेच हवामानात बदल झाला तर यापेक्षा ५ टक्क्यांच्या फरकाने कमी-अधिक प्रमाणात पाऊस पडू शकतो, अशी माहिती हवामान विभागाचे शास्त्रज्ञ डॉ. एम. मोहापात्रा यांनी दिली.

मे महिन्याच्या अखेरिस दीर्घकालीन मान्सून अंदाजाच्या दुसऱ्या टप्प्याची माहिती जारी केली जाईल, अशी देखील माहिती हवामान विभागाचे शास्त्रज्ञ डॉ. एम. मोहापात्रा यांनी दिली.

# ज्येष्ठ गायिका आशा भोसले अनंतात विलीन




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : ज्येष्ठ पार्श्वगायिका, पद्मविभूषण तसेच महाराष्ट्र भूषण पुरस्काराने सन्मानित आशा भोस-ले यांचे १२ एप्रिल २०२६ रोजी वयाच्या ९३ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर सोमवारी दादर येथील कै.भागोजी कीर हिंदू स्म शानभूमी येथे शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी पोलीस दलातर्फे बंदुकीच्या तीन फैरी झाडून मानवंदना देण्यात आली.

दिवंगत आशा भोसले यांच्या अंत्यसंस्कार प्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, मंत्री छगन भुजबळ, मंत्री ड.आशिष शेलार, मंत्री शंभूराज देसाई, मंत्री भरतशेठ गोगाव-ले, मंत्री संजय शिरसाट, मुंबई म हानगरपालिका महापौर रितू तावडे, खासदार अनिल देसाई, आमदार रविंद्र चव्हाण, आमदार प्रसाद लाड, आमदार प्रकाश सुर्वे, आमदार महेश सावंत, मुंबई महानगर पालिका उपमहापौर संजय घाडी, मुंबई म हानगरपालिका आयुक्त अश्विनी भिडे, मुंबई शहर जिल्हाधिकारी आंचल गोयल, स्थानिक लोकप्रतिनिधी, विविध क्षेत्रातील मान्यवर, कलावंत, चाहते तसेच त्यांच्या कुटुंबीयांनी अखेरचे दर्शन घेत पुष्पचक्र वाहून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. तत्पूर्वी, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याकडून पाठविण्यात आलेले पुष्पचक्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिवंगत आशा भोसले यांच्या पार्थिवावर अर्पण केले.

# भोंदू अशोक खरातच्या घराची ईडीकडून झाडाझडती, ६० कोटींच्या व्यवहारांचा तपास सुरू



नाशिक : भोंदू मांत्रिक अशोक खरातच्या अडचणी दिवसेंदिवस वाढताना दिसत आहेत. एसआयटीच्या चौकशीनंतर आता अंमलबजावणी संचालनालय (एऊ) देखील सक्रिय झालं असून नाशिकमधील त्यांच्या तृप्तबाला निवासस्थानी गेल्या १२ तासांपासून झाडाझडती सुरू आहे. सोमवारी पहाटे ६ वाजल्यापासून ईडीचं पथक दाखल झालं असून सखोल तपास केला जात आहे.

ईडीच्या पाच पुरुष आणि दोन महिला अशा सात जणांच्या पथकाकडून अशोक खरातच्या घरात तपास सुरू आहे. शंभरपेक्षा जास्त जंगम आणि स्थावर मालमत्तांच्या खरेदी-विक्रीशी संबंधित कागदपत्रांची तपासणी करण्यात येत आहे. तसेच बेनामी संपत्ती आणि आर्थिक गैरव्यवहारांशी संबंधित पुरावे गोळा करण्याचं काम सुरू आहे.

अशोक खरातशी संबंधित एकूण ११ मालमत्तांवर ईडीकडून छापेमारी करण्यात आली आहे. नाशिकमध्ये ५, तर पुणे आणि शिर्डीत प्रत्येकी ३ ठिकाणी कारवाई सुरू आहे. समता सहकारी पतसंस्थेशी संबंधित व्यवहारांम ध्ये संशयास्पद हालचाली आढळल्याने हा तपास सुरू करण्यात आला.



## संपादकीय....

### नाकेबंदी

इराणने शत्रू देशांसाठी होर्मुझ सामुद्रधुनी बंद केली असली तरी, भारतीय जहाजे ती सहजपणे प्रवास करत आहेत. इराणने भारतीय जहाजांना एकप्रकारे फ्री-एन्ट्री दिली असून भारताला अघोषित टोल आणि वाहतूक शुल्कातूनही सूट दिली होती. मात्र आता अमेरिकेकडून होर्मुझ नाकेबंदी भारतासाठी डोकेदुखी बनू शकते. अमेरिकेचे नौदल होर्मुझ सामुद्रधुनी ओलांडणाऱ्या कोणत्याही जहाजावर हल्ला करण्याची शक्यता असून ट्रम्प यांनी स्पष्टपणे सांगितले आहे की, टोल यापुढे सहन केला जाणार नाही. परिणामी, टोल भरूनही होर्मुझमधून जाणाऱ्या कोणत्याही देशाला अमेरिकेकडून शत्रू म्हणून घोषित केले जाईल. अमेरिकेविरुद्ध तग धरून उभं असलेला इराण सध्या होर्मुझमधून अत्यंत कमी प्रमाणात जहाजांच्या वाहतुकीला परवानगी देत आहे. त्याचवेळी, इराण प्रत्येक जहाजामागे २० लाख डॉलर्सपर्यंत टोल आकारून काही टँकर्सना जाऊही देत असल्याचे अहवालातून समोर आलेले. याहूनही महत्त्वाचे म्हणजे इराणने या प्रदेशातून प्रामुख्याने फक्त आपल्या तेलालाच ये-जा करण्याची परवानगी दिली आहे. अशा परिस्थितीत, अमेरिकेच्या कोणत्याही नाकेबंदीमुळे तेहरानचे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता आहे, ज्यामुळे तेल निर्यात करण्याची आणि महसूल मिळवण्याची क्षमता नाकारली जाईल आणि परिणामी दीर्घकाळ लढा सुरू ठेवायची क्षमता कमी होऊ शकेल.

### अभिवादन भीमरायाला

झिजले तुम्ही चंदनापरी
दिली सर्वांना मायेची सावली
अंधाऱ्या जिवनातुन बाहेर काढलं
अन् प्रकाशाची वाट दावली

बाबा तुम्हाला वाहलेली
हार ,फुले सुकून जातील
तुमचे विचार मात्र प्रत्येकाच्या मनात
सुगंधापरी दरवळत राहतील

क्रांती निर्माण करण्यासाठी
सारे एक होऊनी घेऊया शपथ...
डॉ. बाबासाहेबांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी
पुढे नेऊया समतेच्या चळवळीचा रथ...

आमच्या आयुष्याचं केलं सोनं
देहाचे झिजून केले चंदन...
ज्ञानाच्या महासागराला
जयंती निमित्ताने अंतःकरणातून कोटी, कोटी वंदन...

**कवी – मिलिंद जाधव, पडघा**

# सामाजिक न्यायाचे जनक डॉ. बाबासाहेब आंबेडकर



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या हयातीमध्ये वेगवेगळ्या विषयांना स्पर्श केला. विविध विषय अभ्यासले, हाताळले. आपल्या प्रखर बुद्धिमत्तेमुळे त्यांनी वंचित, उपेक्षित समूहाला तर माणसात आणण्याचं काम केलाच;शिवाय या देशातील सर्व लोकांना समान दर्जा,समान संधी,समान न्याय कसा मिळेल या साठी काम केलं, म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार तर आहेतच, त्याचबरोबर ते खऱ्या अर्थाने सामाजिक न्यायाचे शिल्पकार व सामाजिक न्यायाचे जनक आहेत. हा त्यांचा पैलू मानवी जीवनाच्या परिवर्तनामध्ये अत्यंत महत्त्वाचा ठरतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून समता, स्वातंत्र्य, बंधुता व न्याय या मूल्यांना घटनात्मक अधिष्ठान दिले. जे आरक्षण, मूलभूत अधिकार सामाजिक व शैक्षणिक सोयी या पासून वंचित आहेत त्यांच्यासाठी विशेष तरतुदी करून त्यांनी या शोषित, वंचित, पिडित समाजाला मुख्य प्रवाहात आणण्याचं महान कार्य केलं. आजही सामाजिक न्यायाच्या प्रत्येक चळवळीचा पाया बाबासाहेबांच्या विचारावर आधारित आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जात, धर्म, लिंग, आर्थिक स्थिती व सामाजिक स्तरावरील असमानतेला समता, बंधुता, न्याय या त्रिसूत्रात बांधले. त्यामुळेच आज अनेकांना सामाजिक न्याय मिळतो आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे या देशातील १४० कोटी जनतेवर अनंत उपकार आहेत.त्यांनी राज्यघटनेच्या माध्यमातून या देशातील प्रत्येक नागरिकाला सक्षम बनविण्याचं काम केलं. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी २ वर्षे ११ महिने १८ दिवस अत्यंत मेहनत करून जगातील अतिशय चांगली भारतीय राज्यघटना या देशाला दिली.आज भारतीय राज्यघटनेचा अमृत महोत्सव साजरा झाला. या राज्यघटनेच्या माध्यमातून अनेक जण समतेची फळे चाखत आहेत.राज्यघटनेतच त्यांनी समानतेचा पाया रचला. भारतीय राज्यघटना जी आहे त्यात प्रारंभी असलेली प्रास्ताविका बरंच काही सांगून जाते. या प्रास्ताविकेमध्ये समता, स्वातंत्र्य, न्याय,बंधुता ही मूल्य तर आहेतच त्याचबरोबर या उद्देशिकेमध्ये अखिल मानव कल्याणाचा, त्यांच्या उत्कर्षाचा कल्याणकारी मार्ग आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजातल्या प्रत्येक घटकाला न्याय कसा मिळेल यासाठी अहोरात्र कष्ट घेतले, परिश्रम केले. यासाठी त्यानी खूप वाचन केले,अनेक संदर्भ ग्रंथ शोधले आणि त्या सखोल ज्ञानातून आणि अनुभवातून भारतीयांना त्यांचे मूलभूत हक्क प्रदान करण्याचं काम त्यानी केलं. जे मूलभूत हक्क दिले आहेत,त्यामध्ये समानतेचा स्वातंत्र्याचा, शोषणाविरुद्धचा, धर्म स्वातंत्र्याचा हक्क आहे. सांस्कृतिक, शैक्षणिक हक्क आहे. संविधानिक उपाययोजनाचा हक्क आहे. असे महत्त्वाचे कितीतरी हक्क घटनेच्या माध्यमातून दिले म्हणून ते सामाजिक समतेचे पुरस्कर्ते आहेत. घटनाकार डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी या देशातील प्रत्येक घटकाला न्याय देण्याचा प्रयत्न केला. त्यांनी एका विशिष्ट धर्मापुरते किंवा जातीपुरते मर्यादित काम केले नाही तर सबंध भारतीयांसाठी काम केले. त्यांचा दृष्टिकोन सामाजिक न्यायाचा, सामाजिक सामाजिक समता प्रस्थापित करण्याचा होता. १९४६ ते १९५० पर्यंत संविधानिक सभेत ते कार्यरत असताना आणि ते राज्यघटनेच्या मसुदा समितीचे अध्यक्ष असताना त्यांनी राज्यघटना तयार करताना त्यात त्यांनी सर्वांना समान मूलभूत हक्क बहाल केले. समस्त मागासवर्गीयांच्या सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक प्रगतीसाठी सरकारची जबाबदारी निश्चित करणारी राज्य धोरणाची मार्गदर्शक तत्वे राज्यघटनेमध्ये समाविष्ट केली. यासोबतच अनेक सामाजिक हिताच्या, त्यांच्या उत्कर्षांच्या,त्यांच्या कल्याणाच्या वेगवेगळ्या तरतुदी राज्यघटनेमध्ये केल्या. त्यामुळेच आज या देशातील अनुसूचित जाती- जमाती इतर मागासवर्ग स्त्रिया, लहान मुले, समस्त वंचित घटक जो दुर्लक्षित समूह आहे ते आज सुरक्षित व सन्मानाचे जीवन जगत आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या लहानपणी व आपल्या जीवनामध्ये अनेकदा हाल, अपेष्टा सहन केल्या. जातीयतेचा सामना केला. स्पृश्य -अस्पृश्य भेदाभेद याचा सामना केला परिणामी, त्यांनी समतेसाठी या संघर्षामुळेच प्रयत्न केले. त्यांनी या देशाची लोकशाही भक्कम करण्यासाठी, राज्यघटनेमध्ये सर्वांच्या उत्कर्षाची, सर्वांच्या उद्धारांची कवचकुंडले दिली.

राज्यघटनेच्या माध्यमातून समता,स्वातंत्र्य,न्याय आणि बंधुता ही मूल्य एका विशिष्ट वर्गापुरती नाही तर ती सबंध भारतीयांसाठी त्यांनी दिलेली आहेत, म्हणून ते खऱ्या अर्थाने सामाजिक न्यायाचे पुरस्कर्ते ठरतात.

त्यांना नेहमी वाटायचं की स्त्री-पुरुष, गरीब- श्रीमंत, कनिष्ठ-वरिष्ठ, शिक्षित -अशिक्षित अशा प्रत्येक व्यक्तीला समान हक्क, समान संधी, स्वातंत्र्य मिळाले पाहिजे व त्यांच्यासाठी सामाजिक न्यायाची व्यवस्था आणणे ही अपेक्षा लोकशाहीतच पूर्ण होऊ शकते अशी त्यांची धारणा होती. व्यक्तीच्या स्वातंत्र्याचा विरोध करणाऱ्या सर्वंकष राज्यपद्धतीला त्यांचा कायम विरोध होता.अधिकाराचा लाभ समाजातल्या सर्व घटकांना, सर्व जाती-धर्माच्या लोकांना मिळाला पाहिजे. अल्पसंख्याकांना संरक्षण मिळाले पाहिजे यासाठी त्यांचा प्रयत्न होता आणि या सर्व तरतुदी त्यांनी संविधानात केल्या. विशेषतः स्त्रियांच्या बाबतीत त्यांनी महान कार्य केले. स्त्रियांना समानतेच्या सूत्रामध्ये बांधण्याचे काम सुद्धा त्यांनी केलं. १९ व्या शतकामध्ये देशांमध्ये स्त्रियांची परिस्थिती हलकीची होती. भारतातील स्त्री पूर्णतः रूढी, परंपरा,आचार -विचार चाली-रीती, धर्मबंधने यामध्ये अडकलेली होती, दबलेली होती.तिला सुद्धा बंधनमुक्त करण्याचे काम डॉ. आंबेडकर यांनी केले.

महाड येथे चवदार तळ्याच्या सत्याग्रहाचे प्रसंगी बोलताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, ज्ञान आणि विद्या या दोन गोष्टी पुरुषांसाठीच नाही तर त्या स्त्रियांना तेवढ्याच आवश्यक आहेत. पुढील पिढी सुधारण्यासाठी मुलींना शिक्षण दिल्याशिवाय राहू नका. ज्यावरून जात ओळखली जाते असे राहणीमान बदला. दारुड्या नवऱ्याला, मुलाला, भावाला घरात जेवायला वाढू नका. मुलींना शिक्षण द्या.त्यांचे महाड येथील भाषण इतके क्रांतिकारी होते की, महिलांना त्यांच्या भाषणातून प्रेरणा मिळाली आणि आपण स्वावलंबी स्वाभिमानी बनले पाहिजे असा तिथल्या प्रत्येक महिलांना साक्षात्कार झाला व त्यामुळे अनेक महिला शिक्षणाच्या प्रवाहात आल्या. त्यांच्या स्त्रीविषयक विचारावर लक्ष केंद्रित केल्यास त्यांच्या विचारातून सर्व जातीतील स्त्रियांच्या कुटुंबाची स्थिती व प्रतिष्ठा या बाबतीत बाबासाहेबांनी बारकाईने निरीक्षण चिंतन व मनन केल्याचे दिसते. त्यानी भारतीय स्त्रीला गुलामगिरीतून मुक्त केले यातूनही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा समतेचा विचार दृष्टीपथास येतो.

ते नेहमी म्हणायची की, आज सगळ्यात महत्त्वाची जी गरज आहे ती आपल्या लोकांमध्ये समान राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण करणे. लोकांमध्ये मी प्रथम भारतीय नंतर हिंदू,मुस्लिम,शीख, सिंधी,गुजराती कर्नाटकी अशी भावना निर्माण होण्याऐवजी मी प्रथम भारतीयच आहे, अशी समान राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण होणे अत्यंत आवश्यक आहे, असे बाबासाहेब आंबेडकर म्हणायचे. त्यानी आपल्या पूर्ण आयुष्यामध्ये भारतीय समाजजीवनाचा विचार केला. त्यांचे जीवन म्हणजे शोषणमुक्त, समतामुलक समाजक्रांतीचा खऱ्या अर्थाने एक रणसंग्राम आहे, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. त्यांचे व्यक्तिमत्व हे अन्यायाविरुद्ध पेटून उठणारे होते. कारण त्याना जातीयतेचे चटके वेळोवेळी सहन करावे लागले. त्यांना जातीप्रथेचे निर्मूलन व्हावे, असे अनेकदा वाटायचे. त्यासाठी त्यांनी 'अनहीलेशन ऑफ कास्ट' हा ग्रंथ लिहिला. त्यानी जातिव्यवस्थेच्या संदर्भात अनेकदा आपल्या भाषणात जातीव्यवस्था सामाजिक एकोपाला धोका असल्याचे सांगितले. म्हणूनच त्यांनी समतेवर आधारित विवेकील समाज घडविण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. त्यांच्या संघर्षामुळेच आज या देशातल्या प्रत्येक नागरिकाला समान शिक्षण, समान हक्क, समान न्याय, समान स्वातंत्र्य,समान बंधुता मिळते आहे. संविधानातील कलम ३४० ३४१,३४२ अंतर्गत त्यांनी या देशातल्या ओबीसी, अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीं व इतर मागासवर्गीयसाठी विशेष तरतुदी केल्या आहेत.व त्यांना समानतेच्या प्रवाहात आणण्याचा प्रयत्न केला आहे.

एकंदरितच डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य समानतेच्या दृष्टीने अत्यंत मौलिक आहे.

म्हणून ते खऱ्या अर्थाने समतेचे जनक होत.

**– डॉ.बबन जोगदंड**
**विभागप्रमुख, बार्टी,पुणे**
**९८२३३३८२६६**

## निरोगी हृदयासाठी सात सूत्रांचा वापर करा : सुप्रसिद्ध इंटरव्हेन्शनल कार्डिओलॉजिस्ट डॉ. चेतन जैन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : पोषक आहार, सतत कार्यमग्रता -व्यायाम , उंचीनुसार वजन, नियमित आरोग्य तपासणी, ताण तणाव व्यवस्थापन, निर्व्यसनीपणा आणि योग्य औषधोपचार हे तत्व अंगिकारले तर हृदयरोग होणार नाही आणि ज्यांना आहे त्यांना त्यावर सहज मात करता येईल. एखाद्या आजाराचे निदान होऊन उपचार घेण्यापेक्षा तो आजार जडणार नाही याची काळजी भारतातील युवकांनी घेतली पाहिजे. जगात १० मृत्युपैकी ३ मृत्यू हे हृदयरोगापासून होतात. भारतात हृदयविकाराने मृत्युमुखी पडणार्यांपैकी पन्नास टक्केमृत्यू हे वयाच्या पन्नाशी आतील असतात,तर पंचवीस टक्के हे चाळीसीच्या आतील असतात. २०१६ पासून भारतात प्रीमच्युअर मृत्यु होण्यामध्ये हृदयरोग हे एक क्रमांकाचे कारण आहे. युवकांनी योग्य आहार, पुरेशी झोप,नियमित व्यायाम, आणि निर्व्यसनी चारित्र्य ठेवले तर हृदयरोगांसारखे आजार त्यांच्या जवळ सुद्धा येणार नाहीत असे मत सुप्रसिद्ध इंटरव्हेन्शनल कार्डिओलॉजिस्ट डॉ चेतन जैन एस. आर. व्ही. राजेबहादूर हॉस्पिटल कार्डियक साइंसचे विभाग प्रमुख आणि अरिहंत हार्ट क्लिनिक नाशिकचे प्रमुख यांनी व्यक्त केले.मराठा विद्या प्रसार समाज संस्थेच्या निफाड येथील कर्मवीर गणपत दादा मोरे कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालायात प्राध्यापक प्रबोधनी तर्फे आयोजित 'हृदयरोग आणि आजची तरुण पिढी' या विषयावरील व्याख्याना प्रसंगी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर प्राचार्य डॉ. एस. एन. शिंदे, प्रा. डॉ. ज्ञानोबा ढगे, डॉ. अर्चना कावळे, प्रा. डॉ. सुरेखा जाधव,निलेश परजाने,रवींद्र भगत, राहुल कहाणे आदि उपस्थित होते.

डॉ. चेतन जैन पुढे म्हणाले कि, भारताच्या भौगोलिक स्थानामुळे पाश्चिमात्य देशांपेक्षा दहा वर्ष आगोदर भारतीयांना हृदयविकार होण्याचा धोका असतो. परंतु ह्यापेक्षा भारतीय तरुणानाची बिघडती जीवनशैली हृदयविकार होण्यास मोठ्या प्रमाणत कारणीभूत ठरत आहे, मीठ, मैदा आणि प्रक्रियायुक्त साखर याचे आहारातील अति प्रमाण, व्यायामाचा अभाव, जंक फूड संस्कृती, वाढते प्रदुषण ह्यामुळे हृदयविकार मोठ्या प्रमाणात होत आहेत. वारंवार थकवा येणे, श्वासोश्वास घेण्यास अडथळा, चक्कर येणे, छातीत धडधड होणे, छातीत दुखणे,दम लागणे, अशी लक्षणे दिसली तर लवकर डॉक्टरांना दाखवून योग्य उपचार घ्यावेत. एखाद्या व्यक्तीला हृदयविकाराचा झटका आल्यावर पहिले साठ मिनिटात ('गोल्डन अवर') मिळणारा उपचार फार महत्वाचा असतो. ह्या काळातील उपचार रुग्णास जीवनदान देतो. असे मत व्यक्त केले. वयाच्या तिसीनंतर नियमित कोलेस्ट्रोल, रक्तदाब, मधुमेहाची तपासणी केली पाहिजे. किमान पंचेचाळीस मिनिटे चालणे, सायकल चालवणे, धावणे, यापैकी कोणताही एक सोपा व्यायाम नियमितपणे केला पाहिजे. असे विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देताना डॉ. चेतन जैन यांनी सांगितले.

अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ एस एन शिंदे म्हणाले कि, प्राध्यापकांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्व विकासासाठी विविध क्षेत्रातील मान्यवर बोलवून उद्बोधन करणे हा प्राध्यापक प्रबोधानीचा उद्देश असून यातून अनेक जीवनोपयोगी ज्ञान प्राप्त होते असे मत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. सुरेखा जाधव यांनी केले तर आभार प्रा. डॉ. ज्ञानोबा ढगे यांनी मानले.


# भीमजंयती मिरवणूक आणि वागणूक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भारतातील जाती धर्माचा नाही तर प्रत्येक माणसाचा उद्धार केलेला एकमेव महामानव म्हणजे डॉ बाबासाहेब आंबेडकर होय. अज्ञाना कडून विज्ञानाकडे, अंधारातून प्रकाशाकडे, गुलामीकडून स्वातंत्र्याकडे, गाव कुसाच्या झोपडी कडून मोठमोठ्या बंगल्या कडे, लाचारी कडून स्वाभिमानाकडे, विषमतेकडून समतेकडे, अन्याया कडून न्यायाकडे, गल्लीपासून दिल्लीकडे, अस्पृश्यांना कडून अधिकाऱ्यांकडे. जे काही परिवर्तन झालेले आहे ते केवळ आणि केवळ डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या मुळेच. याची जाणीव लोकांना आहे म्हणून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती केवळ भारतातच नाही तर जगभर साजरी केली जाते. लोकसहभागातून लोकमहोत्सव साजरा होणे म्हणजे भीमजंयती होय. बा भीमामुळे प्रत्येक माणसात बळ आले, बा भीमामुळे शिक्षण, नोकरी, हक्क अधिकार, सन्मान, स्वाभिमान तर मिळालाच पण देशाचे मालकही होता आले. भीमरायांचे थोर उपकार देशातील प्रत्येक नागरिकांना वर आहेत. समस्त महिलांना मानवाचा दर्जा देऊन मान सन्मान स्वाभीमान बहाल करून पुरूषांच्या बरोबरीने आणुन ठेवले. आज जे काही महिलांचे वैभव आहे, सुख समाधान आणि संपत्ती आहे हे केवळ बाबासाहेब यांच्याच मुळे. याची जाणीव प्रत्येक भारतीय व्यक्तीला असणे आवश्यक आहे. परंतु डोक्यात अजून एवढी जातीची घाण आहे की सुंदर दिसणारे, स्वच्छ गाडीत फिरणारे आणि हक्क अधिकाराच्या बाता करणारे स्त्री पुरुषांच्या डोक्यात जातीची घाण, शिक्षण, हक्क अधिकार, आणि अस्तीत्वाचे उद्धारक कोण याबद्दल अज्ञान आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना एकाच जातीचे उद्धारक, डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे काम एकाच जातीसाठी आहे असे म्हणणारे स्वंयघोषीत हूशार लोक स्त्रिया लेकरू होत नाही म्हणून नवस करतात, स्वतः पैशावाले असुन, स्वतःला शिकलेले समजून अडाणी, गंजेडी, बलात्कारी, भोंदुच्या पाया पडतात, एवढेच नाही तर धर्म, भक्ती आणि विधीच्या नावाखाली पुरुष आपल्या बायका बलकात्काऱ्या कडे, आणि स्त्रीया आपले भले होईल म्हणून आपले शरीर भोंदुकडे देऊन भोंदुला, गंजेडी, बलात्कारी लोकांना स्वतःच मोठे करतात. विधीच्या, भक्तीच्या नावाखाली बलात्कार, आर्थिक, मानसिक शोषण होत असेल आणि एवढे होऊन भोंदुच्या विरोधात एकही शब्द तोंडून निघत नसेल, तरीही त्या लोकांना आपण हुशार आणि बुद्धीमान समजावे? जिवनाचे सोनं, जिवनात सुख शांती समृद्धी कोणतीही भक्ती, कोणताही विधी, कोणतेही कर्मकांड न करता मिळवायचे असेल तर प्रत्येकाला डॉ बाबासाहेब आंबेडकर समजून घेणे आवश्यक आहे. परंतु एक शोकांतिका दिसत आहे ती म्हणजे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना डोक्यावर आणि डोक्यात घेतांना बहुसंख्य एकाच जातीचे लोक घेतांना दिसत आहे. आता वारकरी संप्रदायाचे लोकही बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराची व कार्यांची पेरणी समाजात करत आहेत ही अभिमानाची बाब आहे. अनेक मराठा, ओबीसी तरुण डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना आदर्श माणुन बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराची पेरणी करत आहेत हे ही अभिमानाची गोष्ट आहे. सर्वात महत्त्वाचा मुद्दा हाच आहे की ज्यांना डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याची, उपकाराची, त्यांच्या उपकाराची जाणीव आहे ते लोक भीमजंयती हा दिवस महोत्सव म्हणून साजरा करतात. सर्वात मोठ्या प्रमाणात लोकमहोत्सव म्हणून भीमजंयतीच साजरी होते हे कोणीही नाकारू शकत नाही. पण भीमजंयती साजरी करतांना बरेच लोक भीमाचे कार्य व विचार बाजूला सारून, भीमाचा आदर आणि सन्मान बाजूला सारून भीमजंयती साजरी करतांना दिसतात. जर बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार, कार्य हेच पायदळी तुडवल्या जात असतील तर आपण जयंती नेमकी साजरी कशासाठी आणि कोणासाठी करतो हाच प्रश्न आहे. आज एक समिकरण झाले आहे भीमजंयती म्हणजे मिरवणूक आणि मिरवणूक म्हणजे डिजे आणि डिजे म्हणून दारू. या समीकरणात दारु पिऊन नाचणे, वर्षेभर शांत असलेले वातावरण मिरवणूक दरम्यान खराब करणे, आपापसात भांडणे करून मिरवणुकीला गालबोट लावणे, हे प्रकार होत असतील तर आपण बाबासाहेब आंबेडकर यांना ना डोक्यावर घेत, ना डोक्यात घेत. केवळ माझे बाबासाहेब, आमचा बाप म्हणून त्यांचे विचार पायदळी तुडवण्याचे काम करतो. जेही लोक केवळ डिजे लावण्यासाठी दारू पिऊन नाचण्यासाठी, भिमजयंती साजरी करतात, डिजे लावण्यासाठी भीमजंयती वर्षातून एकदाच येते म्हणून नाचण्यासाठी वर्गणी गोळा करतात ते लोक बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराची जयंती नाही स्वतः ची हौस पुर्ण करून देखावा करण्यासाठी बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाचा वापर करतात. भीमजंयती वर्षातून एकदा नाही दर महिन्यात साजरी करा पण ती विचाराची आणि कार्याची असली पाहिजे. वर्गणी वर्षातून एकदा नाही तर दरमहा जमा करा आणि त्यातून गावात चांगले वाचणालय सुरू करा, शैक्षणिक साहित्य निर्माण करा, त्यातून रोजगार निर्माण करा, वैद्यकीय सुविधा निर्माण करा म्हणजे दररोज भीमजंयती साजरी होईल. पण ते बाजूला सोडून बेरोजगार आणि बेवडे लोक जर जयंती च्या नावाखाली पैसा गोळा करून दारु पिऊन धिंगाणा करत असतील तर जयंती साजरी न केलेली कधीही चांगले. जयंती आली म्हणजे मिरवणूक आलीच. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची, विचाराची, कार्याची मिरवणूक नक्कीच निघाली पाहिजे. पण त्या मिरवणुकीत डिजे नाही तर डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार असले पाहिजे, त्यांचे कार्य असले पाहिजे, मिरवणूकीच्या माध्यमातून मनोरंजन नाही प्रबोधन झाले पाहिजे आणि संपूर्ण गावाचा सहभाग निर्माण झाला पाहिजे तीच खरी भीमजंयती होय. बौद्धांनीच बुद्धीचा वापर न करता बाबासाहेब आंबेडकर यांना मर्यादित करून मिरवणुकीत आपली वागणूक बदलून बाबासाहेब आंबेडकर विचाराला तडा जात असेल तर बौद्ध सोडून इतर लोकांना भीमजंयती निमित्ताने काय धडा घेतला पाहिजे? याचे उत्तर आहे का कोणाकडे? भिमाच्या विचाराची आणि स्वतः आचाराची मिरवणूक नक्कीच निघालो पाहिजे. मिरवणुकी मध्ये सर्वस्तरातील लोक स्वतः हुन सहभागी झाले पाहिजे असे वातावरण पाहिजे. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी कधीच कोणत्याही जातीचा धर्माचा द्वेष केला नाही. डॉ बाबासाहेब आंबेडकर हे अनिष्ट रुढी परंपरा, अंधविश्वास, पाखंड, अन्याय अत्याचार, विषमता या विरोधात होते. आपण ज्या भागात भिम जयंती साजरी करतो किंवा गावातून, वार्डातुन मिरवणूक काढतो त्या परिसरातील लोकांच्या विरोधात बाबासाहेब कधीच नव्हते. ना त्यांनी कधीच द्वेष केला. आज मात्र बाबासाहेब आंबेडकर डोक्यात न घेतल्याने आणि फक्त नाचण्याचा आव अंगात आणून भिमजयंती धुमधडाक्यात साजरी करण्याच्या अतिघाईमुळे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचेच नाव घेऊन द्वेष केला जातो. भिमजयंती निमित्ताने काढलेल्या मिरवणुकीचा उद्देश हा द्वेष पसरवणे, चुकिची



मांडणी करणे हा मुळीच नसला पाहिजे. मिरवणुकीचे नारे, भाषा निवळ्ळ टूकार आणि असंविधानीक होताना दिसत आहे. ज्याला बाबासाहेब आंबेडकर यांच्या बद्दल नारे काय द्यावे याची अक्कल नाही असेच लोक मिरवणुकीला गालबोट लावण्यासाठी आणि विचार पायदळी तुडवण्यासाठी समोर असतात. भिमजयंती निमित्ताने माणुस माणसाला जोडला गेला पाहिजे. बाबासाहेब आंबेडकर घराघरात पोहचले पाहिजे. ज्यांनी बाबासाहेब वाचलेच नाही त्यांना ही जयंती दिनी बाबासाहेब कळाले पाहिजे अशा पद्धतीची जयंती असली पाहिजे. जयंती निमित्ताने हातातील गुटखा, दारू, दगड, मोबाईल बाजूला जाऊन हातात पुस्तक आले तर आपल्या भाषेमधील, शब्दांमधील द्वेष बाजूला जाऊन शाब्दीक आपुलकी निर्माण होईल व माणसं माणसाला जोडल्या जातील.डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराची पेरणी केली तर घरा घरात डॉ बाबासाहेब आंबेडकर जाऊ शकतात. फक्त आपले वर्तन आणि विचार योग्य पाहिजे. म्हणून भिमजयंती साजरी करताना, मिरवणूक काढताना आपली वागणूक भिमाच्या विचाराची आहे की नाही हे प्रत्येकाने तपासून घेतले पाहिजे. तरच जयंती साजरी केल्याचे सार्थक होईल.



**– विनोद पंजाबराव सदावर्ते**
**समाज एकता अभियान**
**रा. आरेगांव ता. मेहकर**
**मोबा: ९१३०९७९३००**

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# एमआयटी गुरुकुलच्या विद्यार्थ्यांचे इस्कॉन मंदिर परिसरात स्वच्छता अभियान

## सेवा उपक्रमातून समाजसेवेचा संदेश







**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : एमआयटी विश्वशांती गुरुकुल स्कूल, वाखरी (पंढरपूर) येथील इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी सीबीएसईच्या 'डएथ' (डर्शीींळलश, एर्वीलरींळेप रपव थीइ एुशीळशपलश ीहीीसह लींळेप) या उपक्रमांतर्गत स्वच्छता अभियान राबविले. समाजसेवेची जाणीव आणि प्रत्यक्ष कृतीचा संगम साधत विद्यार्थ्यांनी इस्कॉन मंदिर परिसर तसेच घाट भागाची स्वच्छता केली. या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांनी केवळ स्वच्छतेचे महत्त्व अधोरेखित केले नाही, तर पर्यावरण संवर्धन आणि सार्वजनिक स्थळांविषयी जबाबदारीची जाणीवही यातून दृढ झाली. विद्यार्थ्यांनी या उपक्रमात उत्साहाने सहभाग नोंदवत आपल्या आजूबाजूचा परिसर स्वच्छ ठेवण्याचा संदेश नागरिकांपर्यंत पोहोचविला.

सीबीएसईद्वारे इयत्ता ९ वी ते १२ वीच्या विद्यार्थ्यांसाठी अनिवार्य असलेला डएथ उपक्रम हा अनुभवाधारित शिक्षणावर आधारित असून समाजसेवा, सहानुभूती आणि वैयक्तिक विकास यांची नोंद ठेवतो. या माध्यमातून विद्यार्थी समाजाशी जोडले जातात आणि कोणत्याही अपेक्षेविना समाजहितासाठी कार्य करण्याची प्रेरणा त्यांना यातून मिळते. देशसेवा आणि सामाहिताची भावना दृढ करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. या उपक्रमाबाबत बोलताना शाळेचे मुख्याध्यापक शिवाजी गवळी यांनी सांगितले की, डएथ उपक्रमामुळे विद्यार्थ्यांचा बौद्धिक, वैयक्तिक, सामाजिक आणि भावनिक असा सर्वांगीण विकास होऊन भविष्यात ते एक जबाबदार आणि संवेदनशील नागरिक बनतील. हा उपक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी यासीर शेख, प्रियंका बांदल, आर. बी. भट्टाचार्य आणि सचिनकुमार शर्मा या शिक्षकांनी विशेष परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांच्या या कार्याचे परिसरातील नागरिकांकडूनही कौतुक करण्यात आले.

# पोयोनिअर कंपनीचे मका बियाणे शेतकऱ्यांना वरदान एकरी ४० ते ६० क्विंटल उत्पन्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/ संतोष मोरे : पंढरपूर तालुक्यातील चळे येथे पायोनियर सीड्स या कंपनीच्या पी ३३१९ या मका पिकाचा पिक पाहणी व शेतकरी मेळाव्याचे आयोजन सिध्दिविनायक अँग्रो सर्व्हिसेस सचिन शिंदे यांनी केले होते यावेळी मोठ्या संख्येन शेतकरी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे अध्यक्ष राम आबा गायकवाड हे होतो तर सुदामदादा मोरे. पटू गायकवाड, राहुल मोरे, संतोष मोरे हे प्रमुख पाहुणे होते. यावेळी पायोनिअर कंपनीचे अधिकारी तुषार साळुंखे यांनी मका पिकाचे सखोल मागदर्शन केले. व पायोनिअर कंपनीच्या मका या पिकाचे एका गुंठ्यातील उत्पन्न प्रत्यक्ष शेतकर्यांना मशीनने करून दाखवले. या कंपनीचे मका बियाणे शेतकर्यांना वरदान ठरत असुन एकरी ४० ते ६० क्विंटल उत्पन्न मिळत असल्याचा दावा या कंपनीने केला आहे.

यावेळी पायोनियर कंपनीचे किशोर पांढरे, तुषार साळुंखे, मारुती कोळी सह सचिन शिंदे व मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

# पंढरपूर तालुका पोलिसांचा डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सवानिमित्त रूट मार्च



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : आज दिनांक १३ एप्रिल २०२४ रोजी पंढरपूर तालुका पोलीस ठाणे हद्दीमध्ये, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सवाच्या अनुषंगाने माननीय सहाय्यक पोलीस अधीक्षक साहेब श्री प्रशांत डगळे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर तालुका पोलीस ठाणे हद्दीतील मौजे आज बाबळगाव शेगाव धुमाळ, खर्डी, कासेगाव या गावांमध्ये मुख्य बाजारपेठ लोक वस्ती गावातील प्रमुख मिरवणूक मार्ग वस्ती बस स्टॅन्ड या भागातून रूटमार्क घेण्यात आला रूट मार्चमध्ये पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक व अंमलदार होमगार्ड यांनी सहभाग घेतला. माननीय सहाय्यक पोलीस अधीक्षक श्री प्रशांत डगळे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सेवा मुजावर, पोलीस उपनिरीक्षक मुंडे, पोलीस उपनिरीक्षक भारत भोसले, विक्रम वडणे, सहाय्यक पोलीस फौजदार रमेश बनसोडे व इतर पोलीस व अंमलदार यांनी सहभाग नोंदवला आहे.

# बारुळ ग्राम पंचायत कडून मारुती बनसोडे यांचा सत्कार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस. के. गायकवाड : तुळजापूर तालुक्यातील परिवर्तन सामाजिक संस्था बोरगाव/नळदुर्ग चे संस्थापक सचिव तथा नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य चे धाराशिव जिल्हा संघटक मारुती बनसोडे यांना सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग महाराष्ट्र शासन यांच्याकडून राष्ट्रपिता महात्मा गांधी राज्यस्तरीय व्यसनमुक्ती सेवा पुरस्कार देऊन सामाजिक न्यायमंत्री मा. ना. संजयजी शिरसाट यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले त्याबद्दल ग्राम पंचायत बारुळ च्या वतीने आज त्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी सरपंच पती शहाजी अण्णा सुपनूर, ग्रामविकास अधिकारी प्रशांत भोसले, सेवानिवृत्त मुख्याध्यापक सुरेश ठोंबरे, ग्राम पंचायत सदस्य सुनील नवगिरे, सेवा निवृत्त सहाय्यक फौजदार महेश ठोंबरे, केशव नवगिरे, पोलिस पाटील शिवाजी सगर, चंद्रकांत वटे, हनुमंत टोपे इत्यादी उपस्थित होते. यावेळी मारुती बनसोडे यांनी केलेल्या सामाजिक कार्याची माहिती ग्राम विकास अधिकारी प्रशांत भोसले यांनी ग्रामस्थाना दिली

# संविधानामुळे महिलांना आरक्षण हे सर्व बाबासाहेबांचं देणं : चंदन सोनकांबळे





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था अक्कलकोट येथे दिनांक १३ एप्रिल रोजी भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी महिलांसाठी केलेले कार्य या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.सर्वप्रथम भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आले. प्रथम कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते चंदन सोनकांबळे पीएचडी रिसर्च कॉल सावित्रीबाई फुले विद्यापीठ पुणे यांचे स्वागत घोडके सर यांनी केले आय एम सी सदस्य मसुती, आय एम सी सदस्य कमलाकर सोनकांबळे यांचे स्वागत केले. सर्व मान्यवरांनी निबंध व वकृत्व स्पर्धेमध्ये भाग घेतलेल्या प्रथम व द्वितीय

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून आयटीआयमध्ये व्याख्यान

क्रमांक आलेल्या प्रशिक्षणार्थी यांचे पुष्पगुच्छ व प्रमाणपत्र देऊन देऊन गौरविण्यात आले.

प्रथम गव्वल मॅडम यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना केली त्यानंतर संस्थेतील प्रशिक्षणार्थ्यांना मा. श्री चंदन सोनकांबळे आपल्या व्याख्यानातून भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार सामाजिक समता, भारतीय राज्यघटने विषयी तसेच महिलांसाठी केलेले कार्य याविषयी त्यांनी महत्व सांगितले. तसेच प्रशिक्षणार्थी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विषयी कविता सादर केली.

सदर कार्यक्रम करिता संस्थेचे प्राचार्य श्री. प्रदीप हरिदास यांचे अनमोल असे मार्गदर्शन लाभले. त्याचप्रमाणे संस्थेचे गटनिदेशक तथा प्रभारी प्राचार्य मा. श्री गणेश काशीद सर यांच्या यांचेही मार्गदर्शन लाभले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ रेणुका गव्वल मॅडम यांनी केले. तर आभार प्रदर्शन श्री वाघमारे सर यांनी केले.

सदर कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता संस्थेतील शिल्प निदेशक नदाफ सर, घोडके सर, गव्वल मॅडम, बगले सर, दिनेश मंठाळे सर, कोणापुरे सर, वाघमारे सर, लेबे सर, बिराजदार सर, सुरवसे सर, सोनंद सर, खंदारे सर, माडेकर, श्रीमती चव्हाण व सर्व कर्मचारी वृंद उपस्थित होते.

# भीमजयंती पर्व आणि आमची जबाबदारी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

'भीमजयंती' अर्थात आनंदोत्सव ! 'माणसा'ला माणूसपण देणारा, जन्मोजन्मीसाठी कृतार्थता, धन्यता पावलेला हा दिवस म्हणजे चौदा एप्रिल. महामानव, बोधिसत्व या भारत भूमीचा कोहिनूर हिरा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्मदिवस अर्थातच भीमजयंती ! प्रचंड अभ्यास करून, मानवतेसाठीचे लढे देऊन, मानापमान सहन करून देशाचा सर्वोच्च नागरी सन्मान मिळविणारे जगविख्यात घटनातज्ज्ञ विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर कोट्यवधी जनमाणासांना ज्यांनी अंधाराच युग संपवून प्रकाशयात्री बनविले. तो आमचा आदर्श आज जन्माला आला असा हा क्रांतदर्शी दिवस म्हणजेच भीमजयंती ! बाबासाहेब म्हणजे प्रेरणेचा स्त्रोत, आदर्शाच एक वलयांकित क्षितिज म्हणजेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर ! ह्या महामानवाच्या जीवनावर दृष्टिक्षेप टाकला तर आपल्या लक्षात येईल. जगामध्ये श्रीमंत शहर असलेल्या अमेरिकेच्या न्युयॉर्क शहरात बाबासाहेब विद्यार्थी दशेत वास्तव्याला होते. पुढे 'लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स ॲन्ड पॉलिटिक्स' या नामांकित इन्स्टिट्युशन मध्ये लोकशाहीची जननी समजल्या जाणाऱ्या लंडन या राजधानीच्या महागड्या शहरात बाबासाहेब उच्च शिक्षणासाठी, संशोधनासाठी राहिले, परंत कधीही त्या संस्कृतीचा आपल्यावर प्रभाव पड दिला नाही. स्वेच्छेने निश्चितच काही या नामांकित इन्स्टिट्युशन मध्ये लोकशाहीची जननी समजल्या जाणाऱ्या लंडन या राजधानीच्या महागड्या शहरात बाबासाहेब उच्च शिक्षणासाठी, संशोधनासाठी राहिले, परंतु कधीही त्या संस्कृतीचा आपल्यावर प्रभाव पडू दिला नाही. स्वेच्छेने निश्चितच काही चांगल्या गोष्टी स्वीकारल्या कारण स्वतःच्या परिवारासाठी कमी परंतु अस्पृश्य, दबल्या पीडलेल्या समाजाच्या उत्थानासाठी, उत्कर्षासाठी ध्येयधुंद वृत्तीने डॉ. बाबासाहेब सदोदित कार्यमग्न राहिले. (परिणामी कुटुंबाकडे दूर्लक्ष झाले. माता रमाई व तिची चार पोरं गेली.) चैनीचं विलासी जीवन कुणाला नको असतं? कोण कवी बाबासाहेबांच्या संदर्भात आपल्या कवनातून लिहितो,

**भरले असते मी माझे घर, शंभराच्या नोटांने**

**परंतु मेला असता समाज माझा सदा उपाशी पोटाने**

अहोरात्र अभ्यास करुन त्या रमाईच्या साहेबांनी अर्धपोटी राहून पावावर दिवस काढले. ती माऊली अनेकदा उपाशी झोपली म्हणून आज आपण सोन्याचा घास खात पाण्याला 'चवदार' केलं. काय नाही दिलं? घासाघासात, श्वासा-श्वासात बाबासाहेब आहेत. एखादी आई जेवढी बाळाची काळजी करते, त्यापेक्षा अधिक काळजी बाबासाहेबांनी समाजाची केली होती. खरचं हा युगविधाता सोसायटीसाठी व राष्ट्रासाठी चंदननासारखा झिजला आहे. शब्दातीत असा बाबासाहेबांचा त्याग, समर्पण आणि संघर्ष आहे. आधुनिक जगाच्या इतिहासात अनेक महापुरुष झाले. त्यांचे त्यांच्या क्षेत्रात काम आहे; परंतु अनेक आघाड्यांवर दीपस्तंभ होऊन प्रकाशवाट दाखविणारा महापुरुष म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकरच !

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जन्मदिवस आम्हीच नव्हे तर जगातल्या अनेक राष्ट्रात जयंती म्हणून मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. आम्ही त्यांच्या अनुयायांनी हे लक्षात ठेवले पाहिजे. की स्वतः किंवा त्यांच्या सहकाऱ्यांनी बाबासाहेबांचा जन्मदिवस (वाढदिवस) कधी साजरा केला का? हा विचारणीय प्रश्न आहे. कधी मोठे फलक लावले का? आताषबाजी केली का? प्रस्तुत प्रश्नाचे उत्तर नकारार्थी आहे. डॉ. बाबासाहेबांच्या हयातीत असे दिमाखदार समारंभ झाले नाहीत. ह्या वरकरणी, वेळखावू आणि आर्थिकदृष्ट्या न परवडणाऱ्या बाबींची बाबासाहेबांनी कटाक्षाने नोंद घेतली आहे. त्यांच्यापुढे जाण्याची बिशाद कुणाची आहे का? एकदा, बाबासाहेबांचे मराठी साहित्यातले ख्यातनाम लेखक तथा



पत्रकार मित्र, आचार्य प्रल्हाद केशव अत्रे यांनी व त्यांच्या सोबतच्या काही जवळच्या सहकाऱ्यांनी बाबासाहेबांना विनंती केली की, आम्ही तुमचा जन्म दिवस साजरा करणार आहोत. तुम्हाला हे व्यक्तिशः आवडणार नाही पण आमची विनंती मान्य कर्तृत्व, सदाचार, प्रज्ञा, शिल, करुणेची त्रिवेणी, वीण आम्हाला आचरणात आणता आली पाहिजे. फक्त त्या आदर्श पुरुषाचा जयजयकार करून चालायचे नाही. जय-पराजयाच्या धुंदीतून आम्हाला पुढे जायचे आहे. कट्टर आंबेडकरवादी, सिने में फौलाद है, आंबेडकर की औलाद है, बाप तो बाप रहेगा ह्यातून युवक-युवतीने पुढे निघा, अभ्यास करा, नैतिकता जपा, चारित्र्याला जपा, स्वाभिमानाचे जीवन जगा, लाभापेक्षा इज्जत प्यारी आहे, भाकरीपेक्षा स्वाभिमान महत्त्वाचा आहे असे बाबासाहेब म्हणतात त्यासाठी आम्ही जगले पाहिजे.

आपला संबंध समाज हा उत्सवप्रिय आहे असला पाहिजे ती चांगली गोष्ट आहे. आम्हाला उत्सवाचे भरतं येतं पण ओसरल्यावर पुढे काय? भीमजयंती पर्वाचा आनंद अनुभवा. पुरण पोळीच जेवण जेवा. बाबासाहेबांच्या जन्माचा निश्चितच आनंद आहे. त्या आनंदाला परस्परात वाटा. एकमेकांना प्रेम द्या. बुध्दाची करुणा एकमेकांत ओता मेत्ता (मैत्रीची) भावना वाढीस घाला. समाज चिंतन मांडा. आपण कुठवर आलो आहोत. याच सिंहावलोकन करा. इतर समाज आपणास नावे ठेवणार नाही असे वागा, आपण बाबासाहेबांचे अनुयायी आहोत ही फार मोठी अदृश्य शक्ती आहे, चेतना आहे यांच स्मरण आपणास असू द्या. आज देहरुपाने बाबासाहेब आपल्यात नाहीत पण त्यांचा लाख मोलाचा आदर्श आम्ही जतन करून आचरणात आणला पाहिजे. बाबासाहेबांच्या दूरदृष्टीतून ज्या बाबी निसटल्या आहेत. (शेवटी बाबासाहेबही माणूस आहेत.) अधुऱ्या राहिलेल्या आहेत त्या आम्ही पूर्ण करण्यासाठी झटलो तर आमचे जीवन धन्य होईल, आमच्या जगण्याचे सार्थक होईल. मोठी खंत वाटते काय अवस्था आहे. बाबासाहेबांनी निर्माण केलेल्या 'पीइएस' मुंबईची? समता सैनिक दल का अंकुचन पावत आहे? कुठे आहे. बाबासाहेब आंबेडकरांची धम्म चळवळ गतिमान करणारी संस्था 'दि बुध्दिस्ट सोसायटी ऑफ इंडिया? आम्ही तुकडे पाडण्यात मोठे पटाईत. बाबासाहेबांच्या स्वप्न संकल्पनेतला पक्ष रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया' हा एकेकाळी काँग्रेस सारख्या महाशक्तिशाली पक्षाला धडकी भरवणारा पक्ष. आम्ही गटागटात वाटून धुळीस मिळवला.

दुसरीकडे दरवर्षी आम्ही ग्रामीण आणि नागरी भागात, उपनगर महानगरात अक्षरशः हजारो कोटी रुपये बाबासाहेबांच्या नावावर खर्ची घालतो. (उधळपट्टी) करतो. काय रचनात्मक काम केलयं बाबासाहेबांना अपेक्षित असणार काम आम्ही किती केलं? हा खरा प्रश्न आहे. फक्त जयंतीमध्ये डीजेच्या तालावर ठेका धरल्यान जमणार आहे का? लगाव, बजाओ म्हणल्याने जमणार आहे का? याचा अर्थ नृत्य करायचं नाही का? नृत्य करा आनंदातच माणूस नाचतो. मोर उन्हाळ्यात नाचत नाही. वर्षा ऋतुत मेघ दाटून आले की, मोर आनंदून धुंई-थुई नाचतो. तसाच तो आमच्या आनंदाचा बहर आहे भीमजयंती ! आम्हाला विस्मरण होऊ नये ते बाबासाहेबांच्या तत्त्वविचारांच, त्यांच्या आदर्शवत मार्गदर्शनाचं त्यांच्या उर्वरित कार्याचं म्हणून आम्हाला सजग राहायचं आहे. काळ मोठा कठीण आणि आव्हानात्मक आहे. देशामध्ये प्रतिक्रांतीची लाट आलेली आहे. आम्हाला बाबासाहेबांचा आदरयुक्त धाक पाहिजे. त्यांची भव्य तेजस्वी मुद्रा पाहून कुणीही विनम्र व्हावं झुकून अभिवादन करावं असं काळजातले नाव म्हणजे बाबासाहेब आंबेडकर ! भीमजयंतीचं स्वरुप आता बदलायची वेळ आली आहे. दोन तीन दशकापूर्वीची साध्या पध्दतीची प्रचंड उत्साही वातावरणातली भीमजयंती आता पुन्हा नव्याने आली पाहिजे. डीजेच्या कर्णकर्कश आवाजाने प्रदुषण होत आहे. वयोवृध्दांना त्रास होत आहे. ग्रामीण भागात झगडे होत आहेत. नशापान करून डीजेच्या धुंदीत नाचणारे अनियंत्रित होत आहेत. हे आनंदामध्ये पडणारे विरजण आम्ही थांबवले पाहिजे. आम्ही आमची जबाबदारी ओळखली पाहिजे. यादृष्टीने मार्गक्रमण केलं पाहिजे. अंतिमतः त्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चरणी त्रिवार अभिवादन करून संबंध जनतेला भीमजयंतीच्या मनःपूत खूप खूप सदिच्छा देतो.

संदर्भ : नवयुग, डॉ. आंबेडकर विशेषांक (१९४७) आचार्य प्र. के. अत्रे

**- डॉ. कोंडबा (विवेकवर्धन) बी. हाटकर,**
**पोस्ट डॉक्टरेट फेलो**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर**
**मो. नं.-९५५२१३३९५१**


# बार्टीच्या विद्यार्थ्यांनी एमपीएससी परीक्षेत मिळवले उज्वल यश; २५ विद्यार्थी उत्तीर्ण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : महाराष्ट्र लोकसेवा आयोग (चझडउ) मार्फत घेण्यात आलेल्या राज्यसेवा परीक्षा २०२४ चा अंतिम निकाल नुकताच प्रसिद्ध झाला.

(दि.०८ एप्रिल २०२६ रोजी) जाहीर झाला आहे. अंतिम निकालाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर हा निकाल महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आला आहे.








डॉ. बाबासाहेच आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे मार्फत देण्यात येणाऱ्या प्रशिक्षणामुळे अनुसूचित जातीच्या गरीब होतकरू विद्यार्थ्यांना प्रशासकीय सेवेत काम करण्यासाठी बार्टी आशेचा किरण आहे.

बार्टी संस्थेच्या प्रशिक्षणामुळे व आर्थिक सहाय्य योजनेच्या सहाय्याने आर्थिक मदत प्राप्त झाली असून एकूण २५ विद्यार्थी यशस्वीरित्या या परीक्षेत चांगल्या पद्धतीने यश संपादन करू शकले आहेत. तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या राज्यसेवा या परिक्षेत विद्यार्थ्याने उत्तीर्ण होऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे संस्थेचा नावलौकिक मिळवला आहे. एमपीएससी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे मंत्री ना संजयजी शिरसाट, सामाजिक न्याय विभागाच्या राज्यमंत्री मा. माधुरीताई मिसाळ,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे प्रधान सचिव डॉ हर्षदीप कांबळे, समाजकल्याण आयुक्त तथा बार्टीच्या महासंचालक श्रीमती दिपा मुधोळ -मुंडे, निबंधक डॉ सुचिता शिंदे, योजना विभागाचे विभागप्रमुख डॉ बबन जोगदंड यांनी करुन त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

महाराष्ट्र लोकसेवा आयोग राज्यसेवा परीक्षा २०२४ यशस्वी

विद्यार्थ्यांचे नाव

१) बेलेकर चिराग मुरलीधर-

मुख्य अधिकारी/ सहाय्यक आयुक्त, गट अ

२) परवेकर प्रतीक साहेबराव -

पोलीस उपअधीक्षक/ सहाय्यक पोलीस आयुक्त, गट अ

३) कांबळे वर्षा ज्ञानदेव -

सहाय्यक संचालक, महाराष्ट्र वित व लेखा सेवा, गट - अ

४)कांबळे सायली सुदाम लता -

सहायक संचालक, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, गट-अ

५)हाटे निलेश नरेश-

सहायक संचालक, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, गट-अ

६)गजभिये सुलभा रमेशराव-

सहायक आयुक्त, राज्य कर, निरीक्षक गट-अ

७) वासनिक आकाश मनोहर-

सहायक आयुक्त, राज्य कर, गट-अ

८)घोरपडे शुभम मोहन-

सहायक आयुक्त, राज्य कर, गट-अ

९ )घुगे राजेंद्र किसनराव-

गटविकास अधिकारी (उच्च श्रेणी) गट-अ

१०) राऊत प्रवीण सुरेश -

गटविकास अधिकारी (उच्च श्रेणी) गट-अ

११) धनंदर मनोज नरेंद्र-

गटविकास अधिकारी (उच्च श्रेणी) गट-अ

१२ )भोसले काजल विलास-

सहायक प्रकल्प अधिकारी (शिक्षण), आदिवासी विकास आयुक्तालय गट ब

१३) धवस्कर संदेश मारुती-

सहायक प्रकल्प अधिकारी (शिक्षण), आदिवासी विकास आयुक्तालय गट ब

१४) गवई मोनिका बाबाराव-

सहायक प्रकल्प अधिकारी (शिक्षण), आदिवासी विकास आयुक्तालय गट ब

१५) सांगडे संदिप आनंदराव-

सहायक प्रकल्प अधिकारी (शिक्षण), आदिवासी विकास आयुक्तालय गट ब

१६) सावंत गोतम अंकुश -

तपासणी अधिकारी (पुरवठा), गट- ब

१७)दळवी संध्या संपत-

तपासणी अधिकारी (पुरवठा), गट ब

१८)शिंदे किरण सुनील-

तपासणी अधिकारी (पुरवठा), गट-ब

१९)शिंदे मनोज विजयकुमार-

तपासणी अधिकारी (पुरवठा), गट- ब

२०) पवार उपा गंगाधर-

तपासणी अधिकारी (पुरवठा), गट-ब

२१)घाडगे अभिजीत गौतम

तपासणी अधिकारी (पुरवठा), गट-ब

२२)पोवार मयूर उर्फ मंदार संजय-

तपासणी अधिकारी (पुरवठा), गट-ब

२३)पवार आकाश गौतम-

तपासणी अधिकारी (पुरवठा), गट- ब

२४ )त्रिभुवन अविनाश अशोक-

मंत्रालय विभाग अधिकारी, गट-ब

२५ )पालके आदिनाथ दिपक-

मंत्रालय विभाग अधिकारी, गट-ब

यशस्वी विद्यार्थीचे विविध क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदन करुन बार्टीचे आभार मानले आहेत.

# जनतेच्या सर्वांगीण उत्थान्नासाठी राज्याकर्त्यांनी फुल्यांचे तत्वज्ञान अंगीकारणे आवश्यक आहे : बी. बी. मेश्राम



## त्रिरत्न बुद्ध विहारात क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले जयंती महोत्सव संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी : ११ एप्रिल २०२६ ला क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त देवळाई रोड, श्रीकृष्ण नगर येथील त्रिरत्न बुद्ध विहारात आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करताना फुलेशाहू आंबेडकराईट स्टडी फाऊंडेशनचे संचालक बी. बी. मेश्राम म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राष्ट्रपिता ज्योतिबा फुले यांना आपले गुरु मानले होते. यावरून आपण त्यांची महानता समजून घेतली पाहिजे. १७ नोव्हेंबर १९५१ ला नाशिक परिसरातील निवडणूक दौऱ्यात मार्गदर्शन करताना बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, सत्तेवर येणाऱ्या कोणत्याही पक्षाला जनतेच्या सर्वांगीण हितासाठी ज्योतिबा फुल्यांचे धोरण आणि लोकशाहीवादी तत्त्वज्ञान घेऊनच पुढे जावे लागेल. अर्थात जनतेच्या सर्वांगीण उत्थान्नासाठी राज्यकर्त्यांनी फुल्यांचे तत्वज्ञान अंगीकारणे आवश्यक आहे. तसेच २८ नोव्हेंबर १९५४ ला मुंबई येथील पुरंदरे स्टेडियम वर संदेश देताना बाबासाहेब म्हणाले होते की, माझे आयुष्य तीन गुरु आणि तीन उपास्य दैवतांनी घडले आहे. त्यातील तीन गुरु म्हणजे तथागत बुद्ध, संत कबीर व राष्ट्रपिता ज्योतिबा फुले होत. तर विद्या, स्वाभिमान आणि शील ही तीन उपास्य दैवते होती. याची मार्मिकता आपण समजून घेतली पाहिजे.

पुढे बोलताना मेश्राम म्हणाले की, वैश्विक स्वरूपाच्या नैतिक मूल्यावर आधारित व्यक्तीसमूह यांच्यातील संस्थात्मक बदलांचा कृती कार्यक्रम राबविण्याचे फुले दांपत्यानी शेवटच्या श्वासापर्यंत प्रयत्न केले. जात-जातीच्या संख्या प्रमाणात कामे नेमा तीख खरी ही न्यायाची रीतीखख असे नमूद करून सामाजिक न्यायासाठी वंचितांना लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व बहाल करण्याची भूमिका त्यांनी प्रथमत: मांडली होती. तसेच सत्तेवाचून सकळ कळा, झाल्या अवकळा, पुसा मनालाखख असे अखंडात नमूद करून राजकीय सत्तेच्या चाव्या किती महत्त्वाच्या असतात? हे त्यांनी हेरले होते. याची जाणीव ठेवून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २४ सप्टेंबर १९४४ ला मद्रास येथे बोलताना शासनकर्ती जमात बनणे हेच आमचे उद्दिष्ट आणि आकांक्षा होय. असे स्पष्ट करून गुरुच्या स्वप्नांना साकार करण्याची भूमिका पार पाडली होती. फुले दाम्पत्यांनी शैक्षणिक कार्य वृद्धिंगत करण्यासाठी 'नेटिव्ह फीमेल्स स्कूल्स इन पुणे' व 'दि सोसायटी फार प्रमोटिंग एज्युकेशन ऑफ महार्स, मांग्स अँड अदर्स' या दोन शिक्षण संस्था स्थापन केल्या होत्या. ज्यामुळे शिक्षण नाकारलेल्या महिला व अस्पृश्यांना शिक्षण घेता आले. त्यांनी १ जून १८७३ ला लिहिलेला गुलामगिरी हा ग्रंथ गुलामांना दास्यत्वातून मुक्त करणाऱ्या निग्रोना अर्पण केला होता. २४ सप्टेंबर १८७३ ला सत्यशोधक समाजाची स्थापना केली होती. सत्सार, शेतकऱ्याचा आसूड, सार्वजनिक सत्य धर्म अशा अनेक ग्रंथाच्या माध्यमातून मानवाच्या उतत्थान्नासाठी विपुल प्रमाणात ग्रंथसंपदा निमाण केली होती. अशा अनेक मुद्द्यावर बी. बी. मेश्राम यांनी सविस्तर मार्गदर्शन केले.

याप्रसंगी याप्रसंगी ॲड. विलास रामटेके यांनी आपले विचार व्यक्त केले. भीमराव वेव्हळ यांनी अध्यक्षता केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अंजली वानखेडे तर आभार प्रदर्शन ॲड. वसंतराव शेजूळ यांनी व्यक्त केले. याप्रसंगी विहाराचे अध्यक्ष बी. जी. वेव्हळ, सचिव ॲड. नेताजी चक्रनारायण, सहसचिव के. एस. खोब्रागडे खोब्रागडे, सहकोषाध्यक्ष प्रमोद साळवे, सोहेल पटेल, ॲड. विलास रामटेके, डॉ. सुनील तायडे, डॉ. मीनल तायडे, डॉ. अरुण कांबळे, मिलिंद दांडगे, ॲड. वसंत शेजुळ, इंजिनीयर बाळासाहेब मोरे, अंगद शेजूले, गौतम वानखेडे, भास्कर गरुड इत्यादी शेकडो उपासक, उपासिका उपस्थित होत्या.

